# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)


## प रि प त्र क

क्र. साप्रवि/सामान्य/वृक्षारोपण/९४९/२०१७ /७६४ दि. २५ जुन, २०१७

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख/अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, दि.१ जुलै ते ७ जुलै २०१७ या कालावधीमध्ये वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजीत करणेबाबत मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र प्राप्त झालेले आहे. (सोबत झेरॉक्स प्रत संलग्न करण्यात येत आहे)

यामध्ये कृषि विद्यापीठे व महाविद्यालयांमधील शिक्षक/ शिक्षकेतर, अधिकारी/ कर्मचारी, NSS, NCC, स्काऊट आणि गाईड यांनी सक्रिय सहभाग घेण्याबाबत त्यांना प्रेरीत आणि उद्युक्त करणेबाबत आवाहन केलेले आहे.

करीता विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी व कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्राप्रमाणे दि. १ जुलै ते ७ जुलै २०१७ या कालावधीमध्ये वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम आपल्या स्तरावर यशस्वीपणे राबविण्याची काळजी घ्यावी. तसेच या संबंधीत नेमून दिलेली सर्व कामे व्यवस्थीत पार पाडावी, हि विनंती.

कुलसचिव
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

प्रतिलीपी :

१) संचालक (सर्व) ------------------------------------------------
२) अधिष्ठाता (सर्व) ------------------------------------------------
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ------------------------------------------------
४) विभाग प्रमुख (सर्व) ------------------------------------------------
५) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ------------------------------------------------
६) नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला
७) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
८) कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ------------------------------------------------
९) मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१०) जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
११) मा. कुलगुरूंचे /कुलसचिवांचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१२) सहायक कुलसचिव (साप्रवि/आस्था/परिक्षा/समिती), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१३) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१४) ------------------------------------------------

क्र.सावनि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११

मंत्री
महाराष्ट्र राज्य

REGISTRAR OFFICE
Dr. P.D.K.V., Akola
In. No. 97
08 JUN 2017

मंत्री
वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक :

विषय :- दिनांक १ जुलै ते ७ जुलै २०१७ ह्या कालावधीत हाती घेण्यात येणाऱ्या ४ कोटी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमामध्ये कृषि विद्यापीठांच्या सहभागाबाबत.

महोदय,

जागतिक स्तरावर उष्णतेत सातत्याने होणारी वाढ, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, हवामान व ऋतू बदल, विरळ होत असलेला ओझोन थर, समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वाढ, वारंवार उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्त्या आणि त्यातून होणारे प्रचंड आर्थिक नुकसान यास मानवी जीवनास सामोरे जावे लागत आहे. या सर्वांची तीव्रता आणि दाहकता कमी करण्यासाठी जिथे मोकळ्या जागा उपलब्ध होतील तिथे मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याशिवाय पर्याय नाही, हे जागतिक स्तरावर मान्य झाले आहे. ह्याचा भाग म्हणून १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

२. राज्यामध्ये १ जुलै २०१६, रोजी जनतेच्या सहभागाने एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट सहज ओलांडले गेले. प्रत्यक्षात एकाच दिवशी २.८२ कोटी वृक्ष लागवड झाली. "लिमका बुक ऑफ रेकॉर्ड" या संस्थेने या आगळ्या वेगळ्या आणि नाविन्य कार्यक्रमाची दखल घेतली आहे. सर्वांच्या प्रामाणिक, आणि स्वंयस्फूर्तीने केलेल्या कामामुळे हे यश संपादन करता आले.

३. वर्ष २०१६ आणि ह्या वर्षातील एप्रिल महिना आधुनिक हवामान नोंदीप्रमाणे गेल्या १३७ वर्षांच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक उष्ण महिना ठरला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरुन ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून, वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यामध्ये २०१७, २०१८ व २०१९ ह्या वर्षात अनुक्रमे ४ कोटी, १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवड करण्याचे नियोजित आहे. वृक्ष लागवडीचा कालावधी प्रत्येक वर्षी १ जुलै ते ७ जुलै असा राहणार आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : सावनि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दिनांक १०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. **कृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये यांच्या परिसरामध्ये आणि त्यांच्याकडील मोकळ्या जागांवर वृक्षारोपण करण्यास प्रचंड वाव आहे.**

४. कृषि विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये NSS, NCC आणि स्काऊट व गाईड अंतर्गत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी आहेत. हे विद्यार्थी प्रस्तावित वृक्षारोपण कार्यक्रमाच्या वेळी विविध विभाग आणि स्वयंसेवी संस्था व अंमलबजावणी यंत्रणांना स्वयंसेवक म्हणून मदत करण्यास पुढे आल्यास सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यास मदत होईल. त्यातून तरूण व संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांना वृक्ष, वन, पर्यावरण, वन्यजीव, जैवविविधता आणि सामाजिक वनीकरण या क्षेत्राबाबत आस्था, प्रेम व जिव्हाळा निर्माण होईल. त्यातून पर्यावरण सुरक्षितता, संरक्षण व संवर्धन यामध्ये मोलाची मदत होईल.

...गुरू यांचे कार्या...
...क्र. 293
5-6-17
Dy. R. Estt. / Gad / Acad
O/o. REGISTRAR
No. R/108

(कृपया पृ.२ पहा.)........

५. नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रुपांतरीत करुन यशस्वीरित्या राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी **"महाराष्ट्र हरित सेना"** स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनांक १५.०६.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी, स्वयंस्फुतीने, स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी, असे अपेक्षित आहे. नोंदणी ही मोबाईल फोनवरून देखील करण्याची सुविधा ठेवण्यात आली आहे. नोंदणी पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याचे व त्यानंतर प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर किंवा एसएमएस वर पाठविले जाते.

६. ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणाऱ्या सभासदांना बक्षिस योजना व इतर सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना आहे.

७. तरी, ०१ जुलै ते ०७ जुलै या कालावधीमध्ये होणाऱ्या वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात कृषि विद्यापीठे व महाविद्यालयांमधील शिक्षक/शिक्षकेतर, अधिकारी/कर्मचारी, NSS, NCC, स्काऊट आणि गाईड यांनी सक्रीय सहभाग घेण्याबाबत आपण त्यांना प्रेरित आणि उद्युक्त करावे, असे मी आवाहन करतो. त्याचबरोबर, विद्यापीठाच्या मालकीच्या मोकळ्या जागांवर अधिक मोठ्या संख्येने वृक्षारोपणाचा आणि संगोपनाचा विस्तारित आणि व्यापक कार्यक्रम हाती घेण्याबाबत देखील विनंती आहे. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांनी आणि शिक्षक/शिक्षकेतर, अधिकारी/कर्मचाऱ्यांना ग्रीन आर्मीचे सदस्य होण्याबाबत देखील आपण नेतृत्व व पुढाकार घ्यावा, अशीही विनंती आहे.

भुमातेला नेसवा उंच तरूंचा शालु भरजरी।
स्वागताला येतील गगनातून पावसाच्या सरी॥
वृक्षांची सावली। तेथे दिसे आम्हा माऊली॥

८. वरील घोषवाक्यामधून वृक्ष लागवडीचे महत्त्व ठळकपणे दिसते. वरील सर्व पार्श्वभूमीवर वृक्षारोपणाच्या ईश्वरीय कामात आपण व्यक्तीशः लक्ष घालून **परिच्छेद ७** येथे नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही केल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन.

आदरपूर्वक !

आपला,

**(सुधीर मुनगंटीवार)**

**प्रति,**

डॉ. आर. जी. दानी,
कुलगुरू,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, अकोला-४४४ १०४.